दै. सत्यप्रभा (1) 29/7/17

# नांदेड महापालिकेत ८२ आक्षेपांवर आज झाली सुनावणी



**नांदेड दि. २८–** नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसंदर्भात प्रभाग निश्चितील आणि वार्ड आरक्षणासंदर्भात आज ८२ आक्षेपांवर सुनावणी झाली. सदरील सुनावणीचा अहवाल निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील स्थायी समितीच्या सभागृहात आज निवडणुकीच्या वार्ड निश्चिती आणि आरक्षणासंदर्भातच्या ८२ आक्षेपांच्या सुनावणीसंदर्भात बैठक झाली. यावेळी आयुक्त गणेश देशमुख, प्राधिकृत अधिकारी, उपायुक्त संतोष कंदेवार, वरिष्ठ लिपीक अक्तर ईनामदार, म. युनुस यांच्यासह आदींची उपस्थिती होती. वार्डाचे नाव बदलण्यासंदर्भातील तीन ते चार आक्षेप निकाली काढले असल्याची चर्चा आहे. तर उर्वरित सर्व आक्षेपांवरच्या सुनावणीचा अहवाल निवडणूक आयोगाडे पाठविण्यात येणार असल्याचे वृत्त आहे.

दै. लोकमत (2)

# महापालिकेत ८२ आक्षेपांवर सुनावणी पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड:** मनपा निवडणुकीसाठी काढण्यात आलेल्या प्रभागरचना व आरक्षणाच्या सोडतीसंदर्भात शुक्रवारी ८२ आक्षेपांची सुनावणी पूर्ण करण्यात आली. मुंबई महाराष्ट्र प्राधिकरणाचे सदस्य सचिव संतोषकुमार यांच्यासमोर सुनावणी पूर्ण झाली.

येत्या ऑक्टोबरमध्ये मनपाची निवडणूक होणार आहे. त्यासाठी १० जुलै रोजी प्रभागरचना व आरक्षण सोडत काढण्यात आली होती. त्यानंतर मनपाच्या प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना ११ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच त्यावर हरकती व सूचना नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार नऊ दिवसांत एकूण ८२ आक्षेप व सुनावणी दाखल करण्यात आल्या होत्या. शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजेपासून स्थायी समितीच्या सभागृहात संतोषकुमार, आयुक्त गणेश देशमुख, निवडणूक विभागाचे उपायुक्त संतोष कंदेवाड यांच्यासमोर हरकती ,आणि आक्षेपावर सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीसाठी एकूण १५ गट तयार करण्यात आले होते. त्यामध्ये प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्यासाठी वेळ देण्यात आला होता. प्रभागरचना, लोकसंख्या आणि मतदारांच्यासंदर्भात हरकती आणि आक्षेप दाखल करण्यात आले होते.

दै. गाववाला (3)

# मनपा वार्ड रचना आक्षेपावर दिवसभर सुनावणी

नांदेड/विशेष प्रतिनिधी



नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मनपा प्रशासनाने वार्ड रचना जाहिर केली होती. या वार्डरचनेवर अनेक आक्षेप आले होते. या आक्षेपाची सुनावणी शुक्रवारी स्थायी समितीच्या सभागृहात निवडणुक विभागाचे अधिकारी संतोष कुमार यांच्या उपस्थितीत पार पडली.

नांदेड वाघाळा महानरगपालिकेची ऑक्टोबर महिन्यात सार्वत्रिक निवडणुक होणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने मनपा प्रशासनाने वार्ड रचना व आरक्षण जाहिर केले होते. परंतु वार्डरचनेवर अनेकांनी आक्षेप घेतला होता. तसेच आरक्षणावरुन निवडणुक आयोगाने आक्षेप घेतला होता. त्यामुळे दुसऱ्यांदा आरक्षण काढण्यात आले. यामुळे मनपा प्रशासनाची चांगलीच अडचण झाली. त्यातच आक्षेपाची संख्या लक्षणीय होती. या आक्षेपावर सुनावनी घेण्यासाठी निवडणुक विभागाने संतोष कुमार यांची नियुक्ती केली.

त्यांच्या उपस्थितीत शुक्रवारी सकाळी ११ पासुन स्थायी समिती सभागृहात आक्षेपावर सुनावनी झाली. एका एका प्रभागनिहाय आक्षेपावर सुनावनी घेण्यात आली. त्यामुळे गदारोळ उडाला नाही. सायंकाळी ४.३० पर्यंत आक्षेपावर सुनावनी झाली. सुनावली झाल्यानंतर कोणतीही माहिती देण्यात आली नाही. रात्री उशिरापर्यंत महापालिकेतील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता किती आक्षेप फेटाळले व किती आक्षेप मान्य केले याची माहिती दिली जात नव्हती. परंतु ज्या नागरिकांनी आक्षेप सादर केले ते आक्षेप निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार योग्य असलेल्यांची नोंद संतोष कुमार यांनी घेतली असल्याची चर्चा आक्षेकर्त्यात होती.